CMYK

वडाळी गावकऱ्यांना करावी लागते पाण्यासाठी पायपीट >> पान 2

निलम गोऱ्हेंनी उपकारांची परतफेड निचपणाने केली : ॲड. जयश्री शेळके >> पान 3

जल जीवन मिशनच्या अपूर्ण कामाने गोहगाववासीयांना पाणीटंचाईचे चटके >> पान 4

**सुविचार**


विचार करा, प्रारंभ करा, आणि आत्मविश्वासाने पुर्ण करा.


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 196 ■ बुधवार, दि. 26 फेब्रुवारी 2025 ■ पाने 4 ■ किंमत रु. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006


# जयंतरावांच्या गुप्त हालचालींमुळे राजकारणात मोठी घडामोड?

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी : राज्याच्या राजकारणात मोठी घडामोड घडण्याची शक्यता असून राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांची एक तास भेट घेऊन चर्चा केल्याची माहिती समोर आली आहे. जयंत पाटलांनी बावनकुळेंच्या मुंबईतील बंगल्यावर ही भेट घेतली असून त्यावेळी भाजपचे मंत्री राधाकृष्ण विखे पाटील हेदेखील उपस्थित होता अशी माहिती समोर आली आहे. पण ही भेट रात्री ८ वाजता झाली आणि ती मतदारसंघातील कामासंबंधी होती अशी प्रतिक्रिया जयंत पाटील यांनी दिली. तर जयंत पाटलांनी घेतलेली ही भेट व्यक्तिगत कामासाठी असल्याचं बावनकुळेंनी सांगितलं.**

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, जयंत पाटील यांनी भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांची मंगळवारी त्यांच्या मुंबईतील बंगल्यावर भेट घेतली. त्यावेळी भाजपचे नेते आणि मंत्री राधाकृष्ण विखे पाटील हेदेखील उपस्थित होते. या तिघांमध्ये एक तासाहून अधिक काळ चर्चा झाल्याची माहिती आहे.

या भेटीवर जयंत पाटील यांनी प्रतिक्रिया दिली आहे. ते म्हणाले की, माझ्या मतदारसंघात महसूल विभागाशी संबंधित काही कामांसाठी आपण बावनकुळेंची भेट घेतली. त्यांना वेगवेगळ्या विषयांची निवेदनं दिली.

## भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळेंची भेट घेऊन चर्चा



मस्साजोगचे प्रकरण असो वा साहित्य संमेलनातील वाद असो, राज्यात एवढ्या मोठ्या घडामोडी घडत असताना जयंत पाटील मात्र त्यावर कोणतीही प्रतिक्रिया देत नाहीत. जयंत पाटील हे राष्ट्रवादी शरद पवार यांच्या पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आहेत. तरीही ते कोणत्याही घडामोडीवर प्रतिक्रिया देत नाहीत. त्यामुळेच ते भाजपच्या वाटेवर असल्याची चर्चा सुरू आहे.

अजित पवार यांनी ज्यावेळी शरद पवारांची साथ सोडली त्यावेळी जयंत पाटील हे आपल्यासोबत यावेत असं अजित पवार यांना वाटत होतं. पण जयंत पाटील यांनी शरद पवार यांच्यासोबत राहण्याचा निर्णय घेतला. मात्र विधानसभा निवडणुकीनंतर मात्र जयंत पाटील यांच्या प्रदेशाध्यक्षपदावर प्रश्न्न उपस्थित केला गेला. त्यामुळे जयंत पाटील यांची कुचंबना होत असल्याची चर्चा आहे.

यावर अजित पवार गटाचे प्रवक्ते अमोल मिटकरी म्हणाले की, काही दिवसांपूर्वी राजारामबापू पाटील कारखान्याच्या कार्यक्रमामध्ये नितीन गडकरी आले होते. त्यावेळीही त्यांची देहबोली सगळं काही सांगत होती. राष्ट्रवादी शरद पवार गटामध्ये असलेल्या अंतर्गत गटबाजीमुळे जयंत पाटील हे अस्वस्थ आहेत. त्यामुळे जयंत पाटील यांनी जर असा काही निर्णय घेतला तर त्यावर काही आश्चर्य वाटणार नाही.

## बोगस पीएचडी धारकांचे धाबे दणाणले! पदव्यांची तपासणी होणार

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** राजस्थान येथील जगदीशप्रसाद झाबरमल टिब्रेवाला विद्यापीठातून (जेजेटीयू) पीएच.डी. मिळविणाऱ्यांची तपासणी केली जाणार आहे. त्याअनुषंगाने केंद्रीय अनुदान आयोगाचे सचिव म नीष जोशी यांनी १२ फेब्रुवारी २०२५ रोजी एका पत्राद्वारे देशभरातील विद्यापीठांच्या कुलगुरूंना अशा बोगस पीएच.डी. तपासणी करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यामुळे बोगस पीएच.डी पदवीधारक किती महाशय आहेत, हे लवकरच स्पष्ट होणार आहे.

विद्यापीठांच्या प्रत्येक कृतीवर यूजीसीचे नियंत्रण असते. तथापि, राजस्थान येथील जगदीशप्रसाद झाबरमल टिब्रेवाला विद्यापीठाने बोगस पीएच.डी. पदवी दिल्याचे दिसून आले. त्यामुळे यूजीसीच्या स्थायी समितीने जेजेटीयूद्वारे सादर केलेली माहिती, डेटा विषण, तपासणी आणि मूल्यांकनानुसार पीएच.डी.च्या तरतुदीचे पालन झाले नाही, असा ठपका ठेवला आहे.

पीएच.डी.च्या पुरस्कारासाठीचे नियम आणि शैक्षणिक मापदंडाला छेद दिला. तसेच यूजीसी पीएच.डी.च्या तरतुदींचे पालन करण्यात जेजेटीयू का अपयशी ठरले? हे स्पष्ट करण्याची संधी देण्यात आली होती. तथापि, जेजेटीयूने फारसा प्रतिसाद दिला नाही, असे यूजीसीने पत्रात नमूद केले आहे.

## जीबीएसची वाढती दहशत! मुंबईत ३ नवे रुग्ण दाखल

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात दिवसेंदिवस जीबीएसचे संकट वाढत चालले आहे. सातत्याने जीबीएसची लागण झालेल्या रुग्णांच्या संख्येत वाढ होत चालली आहे. अशातच आता मुंबईत जीबीएसचे तीन नवे रुग्ण दाखल झाले आहेत. या रुग्णांवर सध्या मुंबईतील जे.जे. रुग्णालयात उपचार सुरु आहेत. त्यामुळे राज्यातील जीबीएसच्या रुग्णांचा एकूण आकडा २१४ वर गेला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, म ागील दोन-तीन दिवसांत धुळे, ठाणे आणि वाडा येथून आलेले जीबीएस बाधित रुग्णांवर मुंबईत उपचार सुरु आहेत. यापैकी ए रुग्णाला व्हेंटिलेटरवर ठेवण्यात आले आहे.

>> पान २

# राज्य सरकारचे कर्मचारी मालामाल

## डीए थेट ३ टक्क्यांनी वाढला, ७ महिन्यांचा फरक मिळणार, फेब्रुवारीत अकाऊंट फुल्ल!

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी : महाराष्ट्र सरकारने राज्यातील शासकीय कर्मचाऱ्यांना मोठी खुशखबर दिली आहे. सरकारने कर्मचाऱ्यांच्या डीएमध्ये ३ टक्क्यांनी वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. विशेष म्हणजे यासंदर्भातला शासन निर्णयही निघाला असून यामध्ये कर्मचाऱ्यांना कोणत्या महिन्यापासून वाढीव डीए मिळणार, याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली आहे.**

राज्य सरकारच्या वित्त विभागाने २५ फेब्रुवारी २०२५ रोजी एक शासन निर्णय जारी केला आहे. या शासन निर्णयानुसार राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय महागाई भत्त्याच्या दरात १ जुलै २०२४ पासून सुधारण करण्यात आली आहे. या सुधारणेनुसार महागाई भत्त्याचा दर ५० टक्क्यांवरून ५३ टक्क्यांपर्यंत वाढवण्यात आला आहे. म्हणजेच आधीच्या डीए दरामध्ये तीन टक्क्यांची वाढ करण्यात आली आहे. विशे, म्हणजे हा वाढीव डीए १ जुलै २०२४ पासून लागू होणार आहे.

या शासन निर्णयानुसार वाढीव डीए १ जुलै २०२४ पासून लागू होईल. हा वाढीव डीए फेब्रुवारी महिन्याच्या वेतनात दिला जाईल. म्हणजेच १ जुलै २०२४ ते ३१ जानेवारी २०२५ या सात महिन्यांचा वाढीव डीए फेब्रुवारी २०२५ महिन्याच्या वेतनात थकबाकी म्हणून दिला जाईल. गेल्या अनेक दिवसांपासून आमच्या डीएमध्ये वाढ करावी, अशी मागणी शासकीय कर्मचाऱ्यांकडून केली जात होती. त्यासाठी संघटनात्मक पातळीवर प्रयत्नही चालू होते. दरम्यान, सरकारने सध्याच्या महागाईचा विचार लक्षात घेता डीएमध्ये वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयाचे शासकीय कर्मचारी स्वागत करत आहेत. सात महिन्यांचा थकित डीए आता फेब्रुवारी महिन्याच्या पगारात येणार असल्यामुळे कर्मचाऱ्यांकडून समाधान व्यक्त केले जात आहे.



दरम्यान, केंद्र सरकारच्या धर्तीवर राज्य सरकारने हा महागाई भत्ता वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. आता ५० टक्के असलेला महागाई भत्ता ५३ टक्के करण्यात आला आहे. या निर्णयाचा राज्यातील एकूण १७ लाख शासकीय कर्मचाऱ्यांना फायदा होणार आहे. या निर्णयाच्या अंमलबजावणीला आता सुरुवात झाली आहे. फेब्रुवारीच्या महिन्यात कर्मचाऱ्यांच्या बँक खात्यात वाढीव पगार मिळेल.

# मंत्रालयाच्या चौथ्या मजल्यावरून तरुणाची उडी

## सुरक्षा जाळीवर अडकल्याने वाचला जीव; वार्तांकन करणाऱ्या पत्रकारांना पोलिसांची धक्काबुक्की

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** मंत्रालयाच्या सुरक्षा जाळीवर एका युवकाने उडी घेत आंदोलन सुरु केलं आहे. युवकानं सुरक्षा जाळीवर उडी मारल्यानंतर पोलिसांनी देखील जाळीवर उड्या घेत त्या युवकाला ताब्यात घेतलं आहे. इंकलाब जिंदाबादच्या घोषणा हा युवक देत आहे. यावेळी युवकाच्या हातात इंकलाब जिंदाबाद लिहलेली पत्रके होती. ही पत्रके देखील परिसरात फेकण्यात आली आहेत.मंत्रालयात पुन्हा एकदा सुरक्षा जाळीवर उडी घेत एका युवकाने आंदोलन केलं आहे.

>> पान २



# कांदा प्रश्न पेटला!

## निर्यात शुल्क हटवा, अन्यथा कृषीमंत्र्यांच्या दारासमोरच आंदोलन, राजू शेट्टींचा इशारा



**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** सध्या राज्यातील कांदा उत्पादक शेतकरी संकटात आहे. कारण दिवसेंदिवस कांद्याच्या दरात मोठी घसरण होताना दिसत आहे. अशातच कांदा निर्यातीच्या मुद्यावरुन स्वाभिमानी शेतकरी संघटना आक्रमक झाली आहे. कांद्याच्या निर्यातीवर लावलेलं २० टक्क्याचं निर्यात शुल्क तातडीनं सरकारनं हटवावं अन्यथा थेट कृषिमंत्र्यांच्या दारासमोरच आंदोलनाचा इशारा दिला स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे प्रमुख राजू शेट्टी यांनी दिला आहे.

राजू शेट्टी यांनी आज नाशिक जिल्ह्यातील स्वाभिमानी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांची भेटी घेत चर्चा केली. यावेळी त्यांनी सरकारला इशारा दिला आहे. शेतकऱ्याची भिकाऱ्याची तुलना करण्यापेक्षा कांद्यावरील २० टक्के निर्यात शुल्क रद्द करा असे शेट्टी म्हणाले. सरकारनं कांदा जास्तीत जास्त निर्यात कसा करता येईल यावर अधिक भर देण्यासाठी प्रोत्साहन पर योजना जाहीर करण्याची मागणी देखील शेट्टी यांनी केली आहे.

**नेमकं काय म्हणाले राजू शेट्टी ?**

कांद्याचे दर हे सातत्याने कमी होत आहेत. ३००० रुपयाने विक्री होणारा कांदा २००० रुपयांवर आला आहे. आणखी दर कमी होण्याची शक्यता आहे.

>> पान २

# कर्नाटक-महाराष्ट्रातील बससेवा पूर्ववत करण्यासाठी हालचाली

बेळगाव : कर्नाटकमधील चित्रदुर्ग येथे महाराष्ट्र परिवहन मंडळाच्या चालकाला मारहाण झाल्यानंतर राज्य परिवहन मंडळाने कर्नाटकात जाणाऱ्या बसच्या फेऱ्या बंद केल्या आहेत. त्यामुळे दोन्ही बाजूंकडील, सीमाभागातील प्रवाशांची गैरसोय होताना दिसत आहे. त्यावर तोडगा काढण्यासाठी आणि दोन्ही राज्यांतील बस सेवा पूर्ववत करण्यासाठी बेळगाव आणि कोल्हापूरच्या जिल्हाधिकाऱ्यांनी व्हिडीओ कॉन्फरन्सच्या माध्यमातून चर्चा केली. दोन्ही राज्यांतील बससेवा पूर्ववत करण्यासाठी आवश्यक उपाययोजना आणि सुरक्षा याविषयी बेळगाव आणि कोल्हापूरच्या जिल्हाधिकाऱ्यांनी सविस्तर चर्चा केली.



कर्नाटकच्या बस फक्त महाराष्ट्र सीमेपर्यंत तर महाराष्ट्राच्या बस कर्नाटक सीमेपर्यंत धावत आहेत. यामुळे सीमाभागातील प्रवाशांची पंचाईत होत आहे. त्यामुळे बेळगाव आणि कोल्हापूरच्या जिल्हाधिकाऱ्यांमध्ये बैठक झाली. बैठकीला बेळगाव जिल्हा पोलिस अधीक्षक डॉ. भीमाशंकर गुळेद, कोल्हापूरचे जिल्हाधिकारी अमोल येडगे, तसेच कोल्हापूर जिल्ह्याचे पोलिस अधीक्षक महेंद्र पंडित उपस्थित होते.

बेळगावचे जिल्हाधिकारी मोहम्मद रोशन यांनी सांगितले की, प्रवाशांच्या सोयीसाठी कर्नाटकची बससेवा महाराष्ट्राच्या सीमेपर्यंत सुरू राहील. तेथून पुढे महाराष्ट्राच्या एसटीतून प्रवाशांना अपेक्षित ठिकाणी पोचवले जाईल.

कोल्हापूर जिल्हाधिकाऱ्यांना यासंदर्भात आवश्यक ती उपाययोजना करण्याची विनंती करण्यात आली आहे. दोन्ही राज्यांतील बसवर किंवा कर्मचाऱ्यावर हल्ले करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल, असे जिल्हाधिकारी मोहम्मद रोशन यांनी स्पष्ट केले.

कर्नाटकमध्ये चित्रदुर्ग येथे महाराष्ट्र एसटीच्या चालकावर हल्ला करणाऱ्या कन्नड संघटनेच्या कार्यकर्त्यांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. महाराष्ट्र पोलिसांनाही अशा घटनांत सहभागी होणाऱ्यावर कठोर कारवाई करण्याची विनंती

CMYK

## गझल सम्राट ; पंकज उधास

आपल्या मलमली आवाजाने गझल गायकीला वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवणारे संगीत रसिकांचे आवडते गझल गायक पंकज उधास यांचा आज पहिला स्मृतिदिन. मागील वर्षी आजच्याच दिवशी म्हणजे २६ फेब्रुवारी २०२४ रोजी पंकज उधास यांचे वयाच्या ७२ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या निधनाने संगीत विश्र्वातील एक तारा निखळून पडला. पंकज उधास हे भारतातीलच नाही तर जगातील एक प्रमुख गझल गायक म्हणून ओळखले जात होते. १९८६ साली आलेल्या नाम चित्रपटातील त्यांनी गायलेल्या चिठ्ठी आई है.... आई है...या गाण्याने ते घराघरात पोहचले. हे गाणे आजही तितकेच लोकप्रिय आहे. नाम चित्रपट यशस्वी होण्यात या गाण्याचा खूप मोठा वाटा होता. या गाण्यांनंतर त्यांनी हिंदी चित्रपटात अनेक गाणी गायली. घायल, साजन, ये दिल्लगी, फिर तेरी कहाणी याद आई, मोहरा यासारख्या चित्रपटातून त्यांनी गाणी गायली. त्यांनी गायलेले ना कजरे की धार, आज फिर तुमपे प्यार आता है, जिये तो जीये कैसे, और आहिस्ता अशी कितीतरी गाणी लोकप्रिय झाली व ही सर्व गाणी गाजली ती त्या गाण्यातील अर्थपूर्ण शब्दांनी आणि पंकज उधास यांच्या मधुर आवाजाने. चित्रपटातील त्यांनी गायलेले गाणी लोकप्रिय झाली तरी त्यांची ओळख ही गझल गायक म्हणूनच राहिली. त्यांचे मोठे बंधू मनहर उधास हे देखील प्रख्यात गझल गायक आहेत त्यांनीच पंकज उधास यांना पहिल्यांदा स्टेजवर गझल गाण्याची संधी दिली. १९७१ साली त्यांनी कर्मा या चित्रपटात पहिल्यांदा पार्श्र्वगायन केले मात्र त्यांची दखल कोणी घेतली नाही त्यामुळे ते कॅनडाला निघून गेले. तिथे त्यांनी छोट्या मोठ्या समारंभात गाण्यास सुरुवात केली. तिथे ते स्टेज शो देखील करू लागले. त्यांचे स्टेज शो ही लोकप्रिय होऊ लागले. भारतात परतल्यावर त्यांनी अनेक स्टेज शो केले मात्र चित्रपटात त्यांना म्हणावी तशी संधी मिळत नव्हती कारण तो जमाना मोहंमद रफी आणि किशोर कुमार यांचा होता. १९७९ साली त्यांना जवाब या चित्रपटातील मितवा रे मितवा... हे गाणे गाण्याची संधी मिळाली या संधीचे त्यांनी सोने केले. हे गाणे लोकप्रिय झाल्यावर त्यांनी गझल क्षेत्रात करियर करण्याचा निर्णय घेतला. दरम्यान त्यांनी अनेक गझल गायली. पंकज उधास यांनी एक से बढकर एक गझल गात रसिकांना मंत्रमुग्ध केले. १९८० साली त्यांच्या गाण्याचा पहिला अल्बम आला. त्यानंतर त्यांच्या गाण्यांचा धडाका सुरू झाला. १९८१ साली मुकर्रर, १९८२ साली तरनुम, १९८३ साली महाफिल, १९८५ साली नायाब हे त्यांचे अल्बम आले. या अल्बम मधील सर्व गाणी रसिकांना आवडली. त्यांच्या गझला इतक्या लोकप्रिय झाल्या की रसिकांनी त्यांना गझल सम्राट ही पदवी दिली. सारं काही विसरायला लावणाऱ्या त्यांच्या गझला आजही रसिक गुणगुणताना दिसतात. त्यांनी आपल्या आवाजाने गझल क्षेत्राला आणि गझल गायकीला ऊर्जितावस्था मिळवून दिली. गझल गायकी लोकप्रिय करण्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता. गझल गायन आणि संगीत क्षेत्रात त्यांनी भरीव योगदान दिले. त्यांच्या याच योगदानासाठी भारत सरकारने त्यांना पद्मश्री हा मानाचा पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला. त्यांच्या निधनाने संगीत आणि गायन क्षेत्राची कधीही भरून न निघणारी हानी झाली आहे. गझल सम्राट पंकज उधास यांना पहिल्या स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

# वडाळी गावकऱ्यांना करावी लागते पाण्यासाठी पायपीट

## पाणी पुरवठा विभागाचे अधग्वट कामे नागरिकांचा करत आहेत जिवासी खेळ : आमदार सिद्धार्थ खरात पोहोचले थेट गावात







**दैनिक आपला विदर्भ**

**मेहकर/प्रतिनिधी :** तालुक्यातील वडाळी हे शेवटच्या टोकावरील गाव आहे. या ठिकाणी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे काम दोन-तीन वर्षापासून प्रलंबित असल्यामुळे नागरिकांना पाण्यासाठी रानोमाळ भटकंती करावी लागत आहे. उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये वडाळी गावामध्ये भीषण पाणी टंचाई निर्माण होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.शेवटच्या टोकावरील गावातील भीषण पाणीटंचाई लक्षात घेता आमदार सिद्धार्थ खरात यांनी प्रत्यक्ष गावात व पाणीपुरवठा करणाऱ्या विहीरीवर जाऊन पाहणी केली.

तसेच ग्रामस्थांशी संवाद साधून समस्या जाणून घेतल्या. त्याचबरोबर सदर समस्या तत्काळ निकाली काढण्याचे आश्र्वासन दिले. तालुक्यातील शेवटच्या टोकावरील गाव असल्याने वडाळी या गावातील समस्या मार्गी लावण्याकडे कायम दुर्लक्ष राहिले आहे. गावात भीषण पाणी टंचाई निर्माण असताना या ठिकाणी पाणी टंचाई कायमस्वरूपी निकाली काढण्यासाठी दोन ते तीन वर्षांपासून महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अंतर्गत करण्यात येणारे पाणीपुरवठ्याचे काम अर्धवट आहे.

सदर काम हे पूर्ण करून घेण्याकडे संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी व पदाधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केले आहे. तर, ठेकेदाराने अर्धवट काम करून उर्वरित काम न करता तेथून पोबारा केला आहे. त्यामुळे गावातील पाणीटंचाईची समस्या ही कायम आहे. उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये निर्माण होणारी मिशन पाणीटंचाई लक्षात घेता, अपूर्ण काम तत्काळ पूर्ण करावे व गावात पाणीपुरवठा सुरू करावा अशी मागणी वडाळी गावातील ग्रामस्थांकडून होत असताना आमदार सिद्धार्थ खरात यांनी वडाळी गावात जाऊन प्रत्यक्ष कामाची पाहणी केली. तसेच यावेळी ग्रामस्थांशी संवाद साधून समस्या जाणून घेतल्या. त्याचबरोबर सदर समस्या निकाली काढण्याचे आश्वासन देत जीवन प्राधीकरणचे अधिकारी व ग्रामपंचायत प्रशासनाला पाणीटंचाई निवारण्याबाबत उपाययोजना करून गावात तत्काळ पाणी पुरवठा करण्याचे निर्देश दिले.

# स्वातंत्र्यवीर वि दा सावरकर यांच्या पुण्यतिथी निमित्याने स्व पुंडलिकराव गवळी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा उल्लेखनीय आयोजन

## मरते ते शरीर अमर आहे आत्मा, नेत्रदान ने मिळेल स्वयं परमात्मा; भव्य रॅली व नेत्रादान जनजागृती घोषणा




**दैनिक आपला विदर्भ**

**शिरपूर जैन/ प्रतिनिधी :** डोळे ही ईश्वराने मानवाला दिलेली फार मोठी देणगी आहे; परंतु काही व्यक्ती यापासून वंचित असतात. काही कारणास्तव त्यांना अंधत्व प्राप्त होते. जन्मानंतर त्यांना अंधत्व येते. त्यामुळे अशा व्यक्ती जगाचे सौंदर्य पाहू शकत नाहीत. सौंदर्याने भरलेली सृष्टी ज्यांना पाहता येत नाही, ते या सृष्टीसौंदर्याला मुकतात. या व्यक्तींना नेत्र मिळाले, तर ते सृष्टीचा आस्वाद घेऊ शकतील. परमेश्वराने माणुसकी या नात्याने दृष्टी असणाऱ्या व्यक्तीने दृष्टिहीन व्यक्तीला नेत्रदान केले, तर दात्याच्या जीवनाचे नक्कीच सार्थक होईल. या साठी स्व गवळी विद्यालयातील विद्यार्थी आणि विद्यार्थिनी व शिक्षक वृंद यांनी जनजागृती चा पर्याय निवडला या वेळी महाविद्यालय ते आरोग्यवर्धिनी केंद्र शिरपूर पर्यंत रॅली राष्ट्रीय सेवा योजना विभागाद्वारे आयोजित करण्यात आली.

या वेळी उपस्थित रासे यो कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ.शिवाजी शेंडे, रासेयो महिला कार्यक्रमाधिकारी प्रा. स्मिता लांडे रासेयो सहकार्यक्रम अधिकारी डॉ. प्रा.अपूर्व गुप्ता, प्रा.डॉ श्रीकांत कलाने, प्रा.डॉ जया सोमटकर, प्रा.वरून कुमार लोहिया प्रा.रवी खडसे ग्रंथपाल कल्पना मुरादे व प्राथमिक आरोग्य केंद्र येथील डॉ ऐश्र्वर्या भालेराव, डॉ.बोरसे साहेब, डॉ.गजानन मिटकरी व आरोग्य केंद्रातील सर्व कर्मचारी वृंद महाविद्यालयीन विद्यार्थी उपस्थित होते व या परिसरातील नागरिक विदयार्थ्यांवर कौतुकाचा वर्षाव करत आहेत

# विनाकारण पक्ष डॅमेज झाला! शिंदे गटातील नेते नीलम गोऱ्हेंवर नाराज, एकनाथ शिंदेंकडे महत्त्वाची मागणी

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** उद्धव ठाकरे यांना दोन मर्सिडीज दिल्या की ते एक पद देतात, असे वक्तव्य केल्यामुळे विधानपरिषदेच्या उपसभापती आणि शिंदे गटाच्या नेत्या नीलम गोऱ्हे या वादाच्या भोवऱ्यात सापडल्या आहेत. नीलम गोऱ्हे यांच्या या वक्तव्यानंतर ठाकरे गटाचे प्रमुख नेते त्यांच्यावर अक्षरश: तुटून पडले होते. एकीकडे जहरी टीका आणि अब्रुनुकसानीचा दावा, अशा दुहेरी कात्रीत नीलम गोऱ्हे सापडल्या आहेत. अशात आता शिंदे गटातील सहकारीही त्यांच्या मदतीला पुढे येत नसल्याची माहिती समोर आली आहे. किंबहुना शिंदे गटात नीलम गोऱ्हे यांच्याविषयी नाराजी पसरली आहे.

नीलम गोऱ्हे यांच्या विधानाबाबत एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेतील नेत्यांकडून नाराजीचा सूर व्यक्त केला जात आहे. नीलम गोऱ्हे यांनी साहित्य संमेलनाच्या व्यासपीठावर अशाप्रकारचं वक्तव्य करण्याची गरज नव्हती, असे पक्षातील अनेक नेत्यांचे म्हणणे आहे. गरज नसताना आणि अवेळी केलेल्या वक्तव्यामुळे पक्षाला डॅमेज झाल्याचे या नेत्यांचे म्हणणे आहे. नीलम गोऱ्हे यांनी स्वतः त्यावर समोर येऊन बोलावं, अशी भूमिका शिंदे गटातील या नेत्यांनी घेतल्याचे समजते. त्यामुळे आता नीलम गोऱ्हे प्रसारमाध्यमांसमोर येऊन आपली बाजू मांडणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

ठाकरे गटाच्या संजय राऊत, सुषमा अंधारे, अंबादास दानवे आणि अन्य पदाधिकाऱ्यांनी नीलम गोऱ्हे यांच्याविरोधात टीकेची राळ उठवली होती. मात्र, संजय शिरसाट आणि प्रवक्त्या ज्योती वाघमारे यांचा अपवाद वगळता शिंदे गटातून नीलम गोऱ्हे यांच्या बचावासाठी फार कोणी पुढे आले नव्हते. दिल्लीतील मराठी साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष शरद पवार यांनीही नीलम गोऱ्हे यांच्या वक्तव्याबाबत नाराजी व्यक्त केली होती.

मराठी साहित्य संमेलनात 'असे घडलो आम्ही' या परिसंवादात नीलम गोऱ्हे यांची मुलाखत घेण्यात आली होती. त्यावेळी नीलम गोऱ्हे यांनी उद्धव ठाकरे यांच्याबाबत स्फोटक वक्तव्य केले होते. ठाकरेंच्या शिवसेनेतल्या नेत्यांनाच आम्ही नको झालो होतो. कार्यकर्त्यांना कमी समजण्याचं कारण नाही. शिवसेनेच्या प्रत्येक कार्यक्रमासाठी ठाण्यातून माणसं आणली जायची. गल्ला गोळा करण्याचं काम त्यांना (शिंदेंना) दिलं होतं. (उबाठांच्या शिवसेनेमध्ये) दोन मर्सिडीज दिल्या की पदं मिळायची, असा सनसनाटी आरोप नीलम गोऱ्हे यांनी केला होता.

पान १ वरून...

## जीबीएसची वाढती दहशत!

तर इतर दोन रुग्णांना सर्वसाधारण वॉर्डमध्ये ठेवण्यात आले आहे. दरम्यान, जीबीएसचे मुख्यत: प्रौढ रुग्ण रुग्णालयात येत आहेत, अशी माहिती जे. जे. रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. संदीप सुरवसे यांनी दिली.

काय आहेत लक्षणे?

दूषित अन्न किंवा पाणी घेतल्यामुळे कॅम्पिलोबॅक्टर विषाणू संसर्ग होतो. यामुळे जुलाब आणि पोटदुखी होऊ शकते. काही जणांमध्ये या संसर्गामुळे प्रतिकारशक्ती कमी होते. डेंग्यू, चिकुनगुनिया आणि इतर संसर्गदेखील याला कारणीभूत ठरू शकतात. जुलाब (रक्तासह होऊ शकतो), पोटदुखी, ताप, मळमळ किंवा उलट्या अशी याची लक्षणे आहेत.

काय आहेत उपाय?

नेहमी पाणी उकळून प्या. सकस व ताजे अन्न घ्या. भाज्या व फळे स्वछ धुऊन घ्या. चिकन, मासे चांगले शिजवून घ्या (७५ अंश सेल्सिअस तापमानाला), अर्धवट शिजलेले अन्न व कच्चे अंडे खाणे टाळा. जेवणापूर्वी आणि टॉयलेटनंतर हात साबणाने स्वछ धुवा. दुसत्यांसोबत भांडी वा अन्न वाटून खाणे टाळा. किचन स्वच्छ ठेवा. कच्चे व शिजलेले अन्न वेगवेगळे ठेवा, स्वयंपाकघर व भांडी स्वच्छ ठेवा. हा आजार सामान्यत दुर्मीळ आहे; पण अलीकडील काही दिवसांत पुण्यातील सिंहगड रोड भागात याची प्रकरणे वाढली आहेत. अशा स्थितीत सुरुवातीला जाणवणारी लक्षणे ओळखणे महत्त्वाचे आहे. अतिसार किंवा खोकला येणे, पाय किंवा हातात अचानक अशक्तपणा जाणवणे, चालता न येणे किंवा शरीर बधिर होणे, रक्तासह अतिसार होणे अशी लक्षणे जाणवल्यास त्वरित डॉक्टरांचा सल्ला घ्या.

## मंत्रालयाच्या चौथ्या मजल्यावरुन

आंदोलकाने सुरक्षा जाळीवर उडी मारल्यानंतर एकच खळबळ उडाली. आंदोलकाने सुरक्षा जाळीवर उडी मारल्यानंतर पोलिसांनी धाव घेतली. पोलिसांनीही सुरक्षा जाळीवर उड्या मारत आंदोलकाला ताब्यात घेतलं. मंत्रालयात तरुणाने कोणत्या कारणासाठी आंदोलन केलं, याची माहिती अद्याप समोर आलेली नाही. पोलिसांच्या चौकशीनंतर महत्वाची माहिती समोर येण्याची शक्यता आहे. आंदोलन करणाऱ्या युवकानं सातव्या मजल्यावरुन सुरक्षा जाळीवर उडी घेतली आहे. महसूल खात्यासंदर्भात तक्रार देखील या युवकाने आणली होती. युवकाने जाळीवर उडी घेतल्यानंतर मोठी गर्दी झाल्याचे पाहायला मिळाले. तसेच पोलिसांचा मोठा फौजफाटा देखील याठिकाणी दाखल झाला. अधिकारी देखील दाखल झाले होते. दरम्यान, मंत्रालयात वारंवार अशा घटना घडत आहेत. संपूर्ण मंत्रालयाचा जाळी लावली आहे. कोणत्या प्रकारचा अनर्थ घडू नये यासाठी सुरक्षा जाळी लावण्यात आली आहे.

## कांदा प्रश्न पेटला!

२० टक्क्यांहून अधिक कांद्याचे उत्पादन यावर्षी वाढण्याची शक्यता देखील निर्माण झाली आहे.

अशातच कारण नसताना सरकारनं कांदा निर्यातीवर २० टक्के निर्यात शुल्क लावल्याचे राजू शेट्टी म्हणाले. त्यामुळं सरकारनं आत्ताच उपाययोजना केल्या पाहिजेत. शेतकऱ्याला जर न्याय मिळवून द्यायचा असेल तर निर्यात शुल्क हटवावे आणि निर्यातील प्रोत्साहन द्यावे असे राजू शेट्टी म्हणाले. राज्याचे कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांनी शेतकऱ्यांची भिकाऱ्याबरोबर तुलना करण्यापेक्षा कांदा निर्यात कसा होईल आणि निर्यातशुल्क कसे हटवता येईल हे पाहावं असे शेट्टी म्हणाले. केंद्राकडे पाठपुरावा करावा. कांद्याचे दर आणखी पडले तर कृषीमंत्र्यांच्या दारासमोरच आंदोलन करणार असल्याचा इशारा राजू शेट्टी यांनी दिला आहे.

कांदा दर घसरणीमुळे कांदा उत्पादक शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होत आहे. महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक शेतकरी संघटनेकडून व सर्व राज्यातील शेतकऱ्यांकडून गेल्या अनेक दिवसांपासून केंद्र सरकारने कांदा निर्यातीवरील २० टक्के शुल्क पूर्णपणे रद्द करावे, अशी मागणी होत आहे. दिल्लीतील संसदेच्या अधिवेशनात अनेक खासदारांनी तर नागपूरच्या हिवाळी अधिवेशनात अनेक आमदारांनी कांद्यावरील निर्यातशुल्क कमी करण्यासाठी मागणी केली होती.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### लाडकी बहीण योजना ही योजना नव्हती, हा महिलांची मतं खरेदी करण्याचा कार्यक्रम होता - कल्याण काळे



दैनिक आपला विदर्भ

**जालना/प्रतिनिधी :** लाडकी बहीण योजना ही योजना नव्हती, हा महिलांची मतं खरेदी करण्याचा कार्यक्रम होता असा आरोप जालन्याचे खासदार कल्याण काळे यांनी केला आहे. आतापर्यंत सरकारने १८ लाख महिलांची नावे या योजनेतून वगळली असून, योजनेतून बाहेर काढल्या जाणाऱ्या महिलांचा आकडा ५० आधी ५० लाखांवर जाईल आणि नंतर हळूहळू ही योजनाही बंद होणार असल्याचे भाकीत खासदार काळे यांनी केले आहे. जालन्यातील सिडको प्रकल्पासाठी अधिग्रहण केलेल्या शेतकऱ्यांच्या जमिनीला आधी जो दर दिला तोच दर आता सर्वांना द्यावा, अशी मागणी देखील खासदार काळे यांनी केली.

### मालवण मध्ये देशविरोधी घोषणांचे तीव्र पडसाद, पोलिसांत तिघांवर गुन्हा



दैनिक आपला विदर्भ

**सिंधुदुर्ग/प्रतिनिधी :** चॅम्पियन ट्रॉफीमध्ये भारताने रविवारी पाकिस्तानला पराभूत करून विजय मिळवल्यानंतर देशभरात जल्लोष सुरू असतानाच मालवण-आडवण येथील परप्रांतीय मुस्लिम भंगार व्यावसायिकांनी भारत विरोधी घोषणा दिल्या. याचे तीव्र पडसाद सोमवारी दिवसभरात मालवणात उमटले. मालवणातील सकल हिंदू समाजातर्फे मोटारसायकलद्वारे विराट निषेध मोर्चा काढून संबंधित कुटुंबावर कडक कारवाई करण्याची मागणी केली. तर देशविरोधी घोषणा दिल्याप्रकरणी आडवण येथील मुस्लिम भंगार व्यावसायिक पती, पत्नीसह एका अल्पवयीन मुलाविरोधात येथील पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्या परप्रांतीयकडे स्थानिक आधारकार्ड, पॅन कार्ड, इलेशनकार्ड देखील मिळाले आहे. देश विरोधी घटनेची तत्काळ दखल घेत आ. नीलेश राणे यांनी परप्रांतीय भंगारवाल्याच्या वस्तीमधील अनधिकृत बांधकाम हटविण्याचे पत्र मालवण नगरपालिकेला दिले आणि काही तासतच या बांधकामावर बुलडोझर फिरवण्यात आला, सदरचे बांधकाम जमीनदोस्त केले.

### श्री संत नामदेव पायरीचा दरवाजा चांदीने मडविला



दैनिक आपला विदर्भ

**सोलापूर/प्रतिनिधी :** श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरातील श्री संत नामदेव पायरीच्या दरवाज्याला नांदेड येथील भाविक अरगुलवार परिवारातर्फे चांदी बसवून देण्यात आल्याची माहिती मंदिरे समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली. शंकर दिगंबर अरगुलवार व नरसिमलू दिगंबर अरगुलवार यांनी कै. दिगंबर तुकाराम अरगुलवार व कै. जनाबाई दिगंबर अरगुलवार या आपल्या आई-वडिलांच्या स्मरणार्थ सदरचे काम करून दिले आहे. सदरचे भाविक हे श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे निस्सिम भक्त असून, नियमित दर्शनासाठी येत असतात ते बिलोली जिल्हा नांदेड येथील रहिवासी असून, सदर दरवाजासाठी सुमारे ३० किलो चांदीचा वापर करण्यात आला असून, यासाठी सुमारे ३३ लाख ७५ हजार इतका मजुरीसह खर्च आला आहे. सदरकामी कारागीर म्हणून मे. जव्हेरी ज्वेलर्स, पंढरपूर यांनी सेवा दिली आहे. याशिवाय, त्यांनी २६ ग्रॅम सोने घंटन श्री रूक्मिणी मातेच्या चरणी तसेच १९.९ ग्रॅम सोने नाम व ४५ ग्रॅम चांदीचे जानवे श्री विठ्ठलाच्या चरणी अर्पण केले असून, त्याची बाजार मूल्यानुसार सुमारे ४ लाख १८ हजार इतकी किंमत होत असल्याचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी यावेळी सांगितले.

# निलम गोऱ्हेंनी उपकारांची परतफेड निचपणाने केली : ॲड.जयश्री शेळके

दैनिक आपला विदर्भ





**बुलढाणा/प्रतिनिधी :** शिवसेना पक्षप्रमुख मा.उध्दव बाळासाहेब ठाकरे यांना बदनाम करण्यासाठी निलम गोऱ्हे यांनी एका पदासाठी दोन मर्सिडीज द्याव्या लागत होत्या. असे आक्षेपार्ह विधान केले होते. या वक्तव्याचा जाहिर निषेध म्हणून शिवसेना (उबाठा) पक्षाच्या महिला आघाडीच्यावतीने शिवसेना नेत्या ॲड.जयश्री शेळके यांच्या नेतृत्वात बुलडाणा येथे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निषेध आंदोलन करण्यात आले.

आदरणीय शिवसेनाप्रमुख स्व.बाळासाहेब ठाकरे यांनी स्थापन केलेल्या शिवसेना पक्षासोबत गद्दारी करुन तीन वर्षांपुर्वी काही गद्दार पक्षातून बाहेर पडले होते. त्यांनी पन्नास खोके घेऊन पक्षासोबत पर्यायाने सबंध महाराष्ट्रासोबत गद्दारी करत लाचारी पत्करली. सर्व गद्दार शिवसेनेतून बाहेर पडले त्याच वेळी मा.उध्दव बाळासाहेब ठाकरे यांनी कोणतीही अपेक्षा न ठेवता आपल्या मुख्यमंत्री पदाचा राजीनामा दिला. परंतु आजही महाराष्ट्रात ठाकरे नावाचा दरारा कायम आहे. ठाकरे यांच्या नावाने आजही गद्दारांना घाम फुटतो. त्यामुळेच एका पदासाठी दोन मर्सिडीज द्याव्या लागत होत्या अशी आक्षेपार्ह विधाने करुन शिवसेना पक्षप्रमुखांना बदनाम करण्याचे काम निलम गोऱ्हे सारखे गद्दार करत आहेत. यावरुन स्पष्ट दिसतंय की, अजूनही गद्दारांचा रोजगार ठाकरे या नावाशिवाय पुर्णच होत नाही.

१९९८ मध्ये निलम गोऱ्हे यांनी शिवसेनेत प्रवेश केला. त्यानंतर पक्षाने त्यांच्याकडे उपनेते पदाची जबाबदारी दिली. २००२ पासून आतापर्यंत ४ वेळा त्यांना विधान परिषदेवर निवडून येण्याची संधी दिली. तसेच पक्षप्रमुख मा.उध्दव बाळासाहेब ठाकरे यांच्याच उपकारांवर महाराष्ट्र विधान परिषदेच्या उपसभापती म्हणून आजही त्या कार्यरत आहेत. ज्या शिवसेना पक्षप्रमुखांनी निलम गोऱ्हे यांना अनेक पदे दिली, मानसन्मान दिला, पक्षात आणि समाजात ओळख मिळवून दिली. त्या पक्षाप्रती आणि शिवसेना पक्षप्रमुखांच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करायची सोडून अशा प्रकारची वक्तव्य करुन त्यांनी निचपणाचा कळस गाठला आहे. निलम गोऱ्हे यांनी पक्षप्रमुखांनी केलेल्या उपकारांची परतफेड त्यांच्या निचपणाने केली असे ॲड.जयश्री शेळके म्हणाल्या.

अशा निचपणाचा जाहिर निषेध म्हणून शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्ष महिला आघाडीच्या वतीने शिवसेना नेत्या ड.जयश्री शेळके यांच्या नेतृत्वात आज जिल्हाधिकारी कार्यालय बुलडाणा समोर निषेध आंदोलन करण्यात आले. यावेळी शिवसेना महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा चंदाताई बढे, शिवसेना महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा विजयाताई खडसान, उपजिल्हाप्रमुख कल्पनाताई बोधेकर, सहसंघटक आरतीताई देशमुख, शहर प्रमुख लताताई शिंदे, अर्चनाताई शेळके, भावनाताई पाटील, पुजाताई दाभाडे, रोहीणीताई राजपूत, वैशालीताई वाकोडे, गायत्रीताई गायकवाड, स्वातीताई नवले, शुभांगीताई बाहेकर, मिनाताई गव्हाणे, नंदाताई अंभोरे, रत्नाताई शेळके दिपालीताई जाधव, दिपालीताई राजपूत, स्मिताताई वराडे, सोनालीताई वाघ यांच्यासह अनेक महिला उपस्थित होत्या.

## परदेशातून आलेल्या संस्थेकडून लाच मागितली जात असेल तर ती महाराष्ट्राची बदनामी आहे

### अंबादास दानवे यांची टिका



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** :एमएमआरडीए या संस्थेमध्ये भ्रष्टाचाराशिवाय कोणतीही फाईलपुढे सरकली जात नाही. काम सोडा फाईल सुद्धा पैसे घेतल्याशिवाय पुढे जात नाही मी याच समर्थन करणार नाही, परदेशातून आलेल्या संस्थेकडून देखील लाच मागितली जात असेल तर एमएमआरडीएच्या त्या अधिकाऱ्यावर कडक कारवाई करण्याची आवश्यकता आहे. यामुळे आपल्या महाराष्ट्राची बदनामी होत आहे. असे मत विरोधी पक्षनेते अंबादास दावणे यांनी माध्यम अशी बोलताना व्यक्त केले.

यावेळी ते पुढे म्हणाले की, कॉपी मुक्त या दरवर्षी नुसत्या घोषणा होत असतात, वेगवेगळे भरारी पथक वेगवेगळ्या शिक्षकांची नियुक्ती यात होत असते.परंतु, यामध्ये कोणताही बदल झालेला दिसत नाही, हुशार विद्यार्थ्यांच्या करिअरवर याचा परिणाम होत असतो, जे विद्यार्थी अभ्यास करत असतात. मात्र कॉपी करणाऱ्या मुलांमुळे यांच्या मेरिट परिणाम होतो आणि याला सरकार जबाबदार आहे. यावर कारवाई झालीच पाहिजे, कारण कित्येक मंत्र्याचे पीए,ओएचडी दलालीची काम करत होते. आता धनंजय मुंडे प्रकरणातून लक्षात आलेले आहे. कोण कोण कशी दलाली करत आहे, कसे रेट होते. यावर नियंत्रण ठेवताना मुख्यमंत्र्यानी राज्य भ्रष्टाचार मुक्त केले पाहिजे, विशेषत; भाजप पक्षातील मंत्र्याच्या बाबतीत हे होत होते. फक्त पीए, ओएचडी यापुरतं नियंत्रण राहतात कामा नये, ही यंत्रणा खराब झाली आहे. सरकार एक दिवस हिच योजना बंद करणार आहे, सरकारने ही योजना मत मिळवण्यासाठी सुरु केली होती. त्यामुळे सरसकट महिलांना निधी दिला. आता निधी बंद करत आहेत. इंद्रजित सावंत एक इतिहासकारक आहेत. इतिहासकारांना आपल्या भुमिका मांडण्याचा अधिकार आहे. त्यांनी चुकीची भुमिका ठेवली तर आपल्याला देखील भुमिका ठेवण्याचा अधिकार आहे. धमक्या देणे हे दुर्दैवी आहे. असे मत विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे यांनी व्यक्त केले.

## कोरटकर यांना कोल्हापुरात येऊन दाखवावं त्यांना कोल्हापुरी पायताणाचा प्रसाद दिला जाईल , ठाकरे गट आक्रमक

दैनिक आपला विदर्भ



**कोल्हापूर/प्रतिनिधी** : सोमवारी मध्यरात्री व्हाट्सअप कॉल वरून प्रशांत कोरटकर यांनी इतिहास अभ्यासक इंद्रजीत सावंत यांना संपर्क करत छावा चित्रपटावर एका वृत्त वाहिनीला दिलेल्या मुलाखती मधून आपण ब्राह्मण द्वेष पसरवत आहात असा आरोप केला तसेच अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करत स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराजांबद्दल अपमानकारक वक्तव्य केल्याचा कॉल रेकॉर्ड व्हायरल झाल्यानंतर कोल्हापुरातील राजकीय पक्ष आणि संघटनांनी एकत्र येत पत्रकार परिषद घेऊन प्रशांत कोरटकर यांचा समाचार घेतला, छत्रपती शिवाजी महाराज संभाजी महाराज आणि इतिहासाच्या अभ्यासकांना मुख्यमंत्र्यांचा नावाचा उल्लेख करून धमकी दिल्यानंतर या संघटना आक्रमक झाल्या तसेच कोरटकर यांना कोल्हापुरात येऊन दाखवावं त्यांना कोल्हापुरी पायताणाचा प्रसाद दिला जाईल असा आक्रमक पवित्रा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे शहर समन्वयक हर्षल सुर्वे, अखिल भारतीय मराठा महासंघाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष वसंतराव मुळीक, प्रजासत्ताक संघटनेचे दिलीप देसाई यांच्यासह कार्यकर्त्यांनी दिला.

## गुंगीच्या औषधांसह दोघे कॉलेज तरुण जेरबंद





दैनिक आपला विदर्भ

**धुळे/प्रतिनिधी :** मानवी मेंदूवर विपरीत परिणाम करणाऱ्या गुंगीकारक औषधांसह गोळ्यांची विक्री करण्याच्या उद्देशाने फिरणाऱ्या दोन दुचाकीस्वार तसेच एका माध्यमिक विद्यालयाच्या लिपीकला औषधांच्या साठ्यासह धुळे एलसीबीने ताब्यात घेतले आहे.

धुळे एलसीबी पथकाने शहरातील संतोषी माता चौकातून दोघांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडून औषधांच्या साठ्यासह मोबाईल, दुचाकी असा एकूण दीड लाखाचा मुद्देमाल जप्त केला. तसेच शिरपूरातील अर्थे गावातील एका माध्यमिक विद्यालयातील फार्मसीचे शिक्षण घेतलेला लिपीक महेश ईशी नामक कर्मचारी हा गेल्या अनेक वर्षापासून गुंगीकारक औषधांचा साठा आणून त्याची विक्री करत असल्याची माहिती पोलिस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांना मिळाली होती.

त्यानुसार एलसीबीचे पोलिस निरीक्षक श्रीराम पवार यांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे शहरातील संतोषी माता चौकातील शिवतीर्थनजीक दुचाकीस्वार संशयित कल्पेश गोकुळ जगदाळे,अजय श्रावण कोळी यांना अडवून त्याची अंगझडती घेतली असता, त्यांच्याकडील बॉक्समध्ये ३५ हजार ८३२ रूपये किंमतीचे गुंगीकारक औषधांसह गोळ्या आढळून आल्या. असून त्यांना पोलिसांनी ताब्यात घेत पुढील तपास सुरू केला आहे.

# शिरपूर तालुक्यातील वाहनधारकांचा शिरपूर फर्स्ट वतीने शिरपूर टोल नाक्यावर धडक मोर्चा

दैनिक आपला विदर्भ




**धुळे/प्रतिनिधी :** शिरपूर स्थानिकांना टोल माफ व्हावा व मुंबई आग्रा महामार्गाचे दर्जेदार दुरुस्तीकरण व्हावे या मागणीसाठी शिरपूर तालुक्यातील वाहनधारकांचा शिरपूर फर्स्टवतीने महामार्गावरील शिरपूर टोल नाक्यावर शेकडो स्थानिक नागरिकांनसह धडक मोर्चा काढण्यात आला.

गेल्या आठ महिन्यांपासून शिरपूर फर्स्ट मार्फत शहरालगत असलेल्या टोल नाक्यावर अनधिकृत टोल वसुली विरोधात संघर्ष करीत आहे. टोलच्या दारापासून तर शासनाच्या दरबारापर्यंत पत्रव्यवहार आंदोलन करूनही मार्ग निघत नसल्याने अखेर आज शिरपूर शहरातील चोपडा जीन ते शिरपूर टोल नाकापर्यंत भव्य मोर्चा काढण्यात आला. यावेळी टोल अधिकाऱ्यांसमोर आपल्या विविध मागण्या त्यांनी मांडल्या व शिरपूर तालुक्यालासाठी हा टोल मुक्त करण्यात यावा अशी मागणी त्यांनी यावेळी केली.

दरम्यान मुंबई आग्रा महामार्ग असलेल्या टोलनाक्याचे प्रोजेक्ट हेड कृष्णाराव यांनी देखील आपली प्रतिक्रिया देताना सांगितले आहे की सदर टोल नाका हा अधिकृत असून केंद्र शासनाच्या अधिपत्याखाली हा टोलनाका सुरू असल्याची माहिती त्यांनी यावेळी तसेच शिरपूरकरांसाठी २० किलोमीटर अंतरावर जे काही स्थानिक नागरिक आहे त्यांच्यासाठी देखील सवलत देण्यात आली आहे. मात्र स्थानिक संघटने कडून हा टोलनाका शिरपूरकरांसाठी मोफत झाला आहे अशी अफवा पसरण्यात येत आहे. मात्र असा कुठलाही टोल माफी हा स्थानिकांना देण्यात आला नसल्याचे देखील स्पष्टीकरण टोल प्लाजाचे व्यवस्थापक कृष्णाराव यांनी यावेळी दिले.

विविध वृत्त...

## जामडोह गावकऱ्यांचा मागील दहा वर्षापासून पाणी टंचाईशी सामना





दैनिक आपला विदर्भ

**यवतमाळ/प्रतिनिधी :** तालुक्यातील जामडोह गावात गेल्या दहा वर्षांपासून गावकऱ्यांना पाणी टंचाईचा सामना करावा लागत आहे. जल जीवन मिशन अंतर्गत पाण्याच्या टाकीसाठी निधी शासनाकडून उपलब्ध झाला. मात्र, टाकीचे कामच रखडल्याने पाण्याची झळ गावकऱ्यांना सोसावी लागत आहे. पिण्याचे पाणीच उपलब्ध नसल्याने कोसोदूरवरून पायपीट करीत पाणी आणावे लागते. अनेक वेळा पाण्यासाठी गावकऱ्यांनी रस्त्यावर उतरून आंदोलने केली. त्याची प्रशासनाने कुठलीच दखल घेतली नाही. प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी विहीर खोदकाम करण्यासाठी दहा लाख रुपये निधीची रक्कमही काढण्यात आली. मात्र, विहिरीचे काम अद्यापही करण्यात आले नाही. असा आरोप उपसरपंच संतोष गदई यांनी केला आहे.

## राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांचा जिल्हा दौरा



दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** राजस्थानचे राज्यपाल ना हरिभाऊ बागडे हे बुधवार, दि.२६ फेब्रुवारी २०२५ रोजी बुलढाणा जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहे.

त्यांच्या दौरा कार्यक्रमानुसार दुपारी १२.४५ वाजता जळगाव जामोद येथील दुर्गा चौकातील द खामगांव अर्बन बँक शाखा, येथे आगमन व राखीव, दुपारी १.३० वाजता जळगाव (जा) येथील खामगांव अर्बन बँक शाखेच्या उद्घाटन सोहळ्यास उपस्थिती, त्यानंतर दुपारी २.५० वाजता संभाजीनगरकडे प्रयाण करतील.

## काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष विजय अंभोरे यांची काँग्रेसला सोडचिठ्ठी



दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** विजय अंभोरे यांनी काँग्रेसच्या प्राथमिक सदस्यत्वचा राजीनामा दिला आहे. आज आयोजित पत्रकार परिषदेत विजय अंभोरे यावेळी सांगितले की, खा. मुकुल वासनिक यांच्या नेतृत्वाखाली विविध पदे मिळाली. परंतु, वैयक्तिक कारणांमुळे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या प्रदेश उपाध्यक्ष पदाचा व अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या सदस्य पदाचा राजीनामा दिला आहे. विजय अंभोरे हे गेल्या ४४ वर्षांपासून काँग्रेस पक्षामध्ये सक्रिय कार्यकर्ता म्हणून त्यांनी काम केले असून, त्यांनी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष पद तथा काँग्रेसचे अनुसुचित जाती जमातीचे प्रदेश अध्यक्ष म्हणून सुद्धा या काँग्रेसचे काम केले आहे. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांची प्रदेश अध्यक्ष म्हणून नियुक्ती होताच त्यांच्या जिल्ह्यात काँग्रेसला मोठा झटका बसला असून, त्यामुळे हर्षवर्धन सपकाळ यांच्या नियुक्ती वरती आता काँग्रेसमध्ये नाराजी तर नाही ना असा सुद्धा या ठिकाणी प्रश्न्न निर्माण होत आहे. विजय अंभोरे हे येणाऱ्या कालावधीत कार्यकर्त्यांशी चर्चा करून पुढील निर्णय घेणार असल्याचे यावेळी सांगितले.

# जल जीवन मिशनच्या अपूर्ण कामाने गोहगाववासीयांना पाणीटंचाईचे चटके

## संबंधित दुर्लक्षित यंत्रणेच्या धोरणामुळे : यंत्रणे प्रति जनतेचा तीव्र रोष



भाग २०

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर : तालुक्यातील गोहगाव दांदडे गावाची चांगलीच ओळख आहे. मात्र, अधिकाऱ्याच्या व कंत्राटदाराच्या दुर्लक्षितपणामुळे येथील पाणीटंचाई मात्र, उग्ररूप धारण करण्याची शक्यता निर्माण. गोहगाव वासीयांना पाणीपुरवठा करण्यासाठी मुबलक पाणीसाठा आहे. मात्र, तब्बल १ कोटी ९५ लाख रुपये किंमतीची करण्यात येत असलेल्या जल जीवन मिशनचे कामे अर्धवट असल्याने गोहगाव वासीयांची स्थिती ही धरण उशाला कोरड घशाला अशी झाली आहे. याकडे वरिष्ठांनी लक्ष देऊन उन्हाळ्यातील संभाव्य पाणीटंचाई लक्षात घेता जल जीवन मिशनचे अपूर्ण काम तत्काळ पूर्ण करण्याचे निर्देश द्यावे, आणि गावात पाणीपुरवठा करावा, अशी मागणी जनतेकडून होत आहे.**



देविदास खनपटे
मुख्य संपादक

गोहगाव दांदडे येथील पाणी समस्या निकाली निघावी, यासाठी जल जीवन मिशन अंतर्गत तब्बल १ कोटी ९५ लाख रुपयांचा निधीची योजना करून १५ जुलै २०२२ रोजी कामाला प्रारंभ करण्यात आला होता. सदर काम हे १८ महिन्याच्या कालावधीत पूर्ण करणे अपेक्षित होते.या कामांतर्गत विहीर खोदकाम, पंपगृह, पंपिंग मशिनरी, मुख्य जलवाहिनी, पाण्याची टाकी, वितरण व्यवस्था आदी कामे करणे अपेक्षित होते.असे असताना आतापर्यंत केवळ ७१.८० टक्के काम झाले असल्याचे शासन अहवालावरून दिसून येत आहे.तर, या कामांमध्ये वीर खोदकाम व बांधकाम करण्यात आल्याचे दाखवण्यात आले आहे.त्याचबरोबर पाण्याच्या टाकीचे काम प्रगतीपथावर असल्याचे नमूद केले आहे. असे असले तरी, गोहगाव दांदडे येथील पाणीटंचाई लक्षात घेता सदर काम वेळेत पूर्ण करणे अपेक्षित असताना अधिकारी व कंत्राटदाराच्या दुर्लक्षितपणामुळे येथील काम अद्यापही अपूर्ण आहे. परिणामी, गोहगाववासीयांना उन्हाळ्यात पाणीटंचाईचे चटके लागण्याची शक्यता निर्माण झाली आहे. जलजीवन मिशन अंतर्गत आतापर्यंत मेहकर तालुक्यात ९२ कामे करण्यास प्रारंभ करण्यात आला आहे. मात्र, आतापर्यंत एकाही गावातील काम पूर्ण न झाल्याने जलजीवन मिशनची योजना संशयाच्या भोवऱ्यात अडकली असल्याचे चित्र दिसून येत आहे. एकीकडे शासन कोट्यावधी रुपयाचा खर्च करून पाण्याची सुविधा निर्माण करत आहे. तर, दुसरीकडे मात्र,अधिकारी व कंत्राटदार हे केवळ शासकीय निधीवर डल्ला मारत असल्याचा आरोप जनतेकडून होत आहे. याकडे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लक्ष देण्याची गरज निर्माण झाली आहे.



### धरण उशाला, कोरड घशाला

गोहगाव गावाला पाणीपुरवठा करणाऱ्या यापूर्वीच्या पाणीपुरवठा योजनेच्या विहिरीला पाणी आहे. मात्र, सदर पाणी हे वितरण व्यवस्था कमी पडत असल्याने गोहगाववासीयांना पाणीटंचाईचे सामना करावा लागत आहे. त्यामुळे ही पाणीटंचाई कायमची दूर व्हावी, यासाठी शासनाने तब्बल १ कोटी ९५ लाख रुपयांचा निधी खर्च करून जल जीवन मिशन अंतर्गत प्रत्येक व्यक्तीला ५५ लिटर पाणी देण्याचे जाहीर करून त्यासाठी काम सुरू केले आहे. मात्र, हे काम अर्धवटच असल्याने गोहगाववासीयांना उन्हाळ्यात पाणीटंचईचा सामना करण्याची शक्यता निर्माण झाली आहे. गोहगाव येथे पाणी असताना धरण उशाला व कोरड घशाला अशी स्थिती गोहगाववासीयांची झाली आहे.


## जलजीवन मिशनची कामे करणाऱ्या कंत्राटदारांचे काम बंद आंदोलन

### रखडलेली देयक तत्काळ देण्याची मागणी

दैनिक आपला विदर्भ




**बुलढाणा/प्रतिनिधी :** जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात जलजीवन मिशन ची कामे सुरू आहेत. मात्र, गेल्या वर्षभरापासून शेकडो कंत्राटदारांचे २५० कोटी पेक्षा अधिक देयके थकल्याने कंत्राटदार अडचणीत आले आहेत. त्यामुळे या सर्व कंत्राटदारांनी आजपासून कामबंद आंदोलन सुरू केले आहे. आज बुलढाणा जिल्हा परिषद समोर कंत्राटदारांनी जोरदार घोषणाबाजी केली. उन्हाळ्याची चाहूल लागली आहे, आता ही सर्व कामे बंद पडल्याने अनेक गावांमध्ये पाणी टंचाईचा प्रश्न्न गंभीर होण्याची शक्यता आहे. शासनाकडून निधी येताच कंत्राटदारांची देयके अदा केली जातील, त्यांनी कामे पूर्ण करावीत असे आवाहन देखील प्रशासनाकडून कार्यकारी अभियंता राहुल जाधव यांच्या वतीने करण्यात आले आहे. कंत्राटदारांनी कामे केल्यानंतरही त्यांचे प्रशासनाकडे अडकून पडल्याने कंत्राटदार आर्थिक दृष्ट्या अडचणीत आले आहेत. त्यामुळे शासनाने कंत्राटदाराचे देयक तत्काळ द्यावे, अशी मागणी कंत्राटदार संघटनेचे जिल्हाध्यक्ष अभय इंगळे व कंत्राटदार अतुल लाहोटी यांनी केली आहे.



## दारव्हा तालुक्यात रताळे शेती उत्पन्नातून शेतकऱ्यांच्या घरात आर्थिक समृद्धी



**यवतमाळ/प्रतिनिधी :** दारव्हा तालुक्यात मोठ्या प्रमाणात रताळ्याची शेती केली जाते. महाशिवरात्रीच्या पर्वावर रताळ्याल्या भाविकांची मोठी मागणी असते. रताळ्याच्या उत्पन्नातून शेतकऱ्यांच्या घरात आर्थिक समृद्धी येत आहे. शेतकरी रताळ्याचे उत्पन्न घेत असल्याने त्याचा फायदा शेतकऱ्यांना होत आहे. अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांना नुकसान सहन करावे लागत आहे. लागवड खर्च निघाला नाही, यामुळे शेतकरी निराश झाले आहेत. मात्र, वेगळे पीक घेतल्यास शेतकऱ्यांना फायदा झाल्याशिवाय राहत नाही.

महाशिवरात्रीला रताळे महत्वाचे मानले जाते. उपवासात भाविक रताळे खातात. दारव्हा तालुक्यातील राहुल ताजने या शेतकऱ्याने पाच एकर शेतीत रताळ्यांची लागवड केली. यात त्यांना पन्नास हजार रुपये प्रति लागवड खर्च आला. चार महिन्यांपूर्वी लागवड केलेल्या शेतीला प्रति एकरी दीड ते दोन लाख रुपये उत्पन्न येण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. यामुळे एखाद्या इंजिनिअरप्रमाणे हातात उत्पन्न येत असल्याने समाधान व्यक्त होत आहे. शेतकऱ्यांकडून सोयाबीन, कापूस, तूर लागवड केली जाते. मात्र, सिंचन सुविधा नसल्याने शेतकरी अडचणीत येत आहेत. सिंचन सुविधा असणाऱ्या शेतकऱ्यांनी रताळ, टरबूज असे पीक घेतल्यास शेतकऱ्यांना निराश येणार नाही.

## दोन लाख ३८ हजार रुपयाच्या मुद्देमालासह सागवान चोरटे जेरबंद

### वन विभागाची मोठी कारवाई अवैध सागवान जप्त

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** सागाची लाकडी तोडून त्याची अवैधरित्या वाहतूक करणाऱ्या वाहनावर घाटबोरी वन परिक्षेत्र अधिकाऱ्यासह वनकर्मचाऱ्यांनी कारवाई करून तब्बल २ कोटी ३८ लाख रुपयांच्या वर मुद्देमाल जप्त केला. ही धडाकेबाज कारवाई घाटबोरी वन कर्मचाऱ्याच्या वतीने २३ फेब्रुवारी रोजी करण्यात आली.

घटनेबाबत प्राप्त माहितीनसार गंधारी बीट मध्ये सागवान लाकडाची अवैधरित्या वाहतूक होत असल्याची गोपनीय माहिती वन विभागाच्या कर्मचाऱ्यांना मिळाली या माहितीवरून वनविभागाच्या कर्मचाऱ्यांनी २३ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ४ वाजता मेहकर व घाटबोरी वनपरीक्षेत्रमध्ये सापळा रचला असता गंधारी बिट मौजे गंधारी शिवारा मध्ये एक वाहन (TATA 407) क्रमांक एम.एच.२८ बी ९६२१ व गोल साग माल वाहतूक करताना आढळले असता सदर वाहन चालकाकडे सागवान लाकडाच्या वाहतुकी संदर्भात विचारणा केली असता कोणतेही वैध कागदपत्र नव्हती. त्यामुळे वाहनामधील साग गोल नग ७८ घ.मी.३.३८६ रक्कम २ लाख ३८ हजार ९४६ रुपयांचा मुद्देमाल माल वाहनासह जप्त करण्यात करून आरोपी शेख मुस्तखीम शेख नवाज व मोजीज बेग जमील बेग रा.जिंतूर विरुद्ध भारतीय वन अधिनियम १९२७अंतर्गत कलम४१,४२ नुसार वन गुन्हा दाखल करण्यात आला.

सदरची कारवाई बुलढाणा उपवनसंरक्षक श्रीमती सरोज गवस, मेहकर सहाय्यक वनसंरक्षक वैभव काकडे, वनपरीक्षेत्र अधिकारी अंकुश येवले यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

सदरच्या कारवाही मध्ये वनपरिक्षेत्र अधिकारी घाटबोरी सह मेहकर आणि घाटबोरी वन परीक्षत्रामधील वन कर्मचारी सहभागी होते.पुढील तपास वनपाल आर.



व्ही.निंबेकर करीत आहेत. सदर धडाकेबाज कारवाईमुळे सागवानाची तस्करी करणाऱ्यांच्या मात्र, धाबे दणानले आहेत.